गांवकरी
www.gavakari.net
01 Jun 2025 - Page 2

# वाघ अभियांत्रिकीच्या सहा विभागांना 'एनबीए' मानांकन

**नाशिक : प्रतिनिधी**



के. के. शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, केमिकल व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या सहा विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशन, नवी दिल्ली (एन.बी.ए.)तर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ते २०२७-२८ या तीन वर्षांकरिता मानांकन प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयाच्या सहा विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशन (एन.बी.ए.) कडून मानांकन मिळण्याची ही चौथी वेळ आहे. २००३ पासून सातत्याने विविध विभागांना मानांकन प्राप्त होत आले आहे. सलग चौथ्या फेरीत एन.बी.ए. मानांकन मिळविणारे महाराष्ट्रातील मोजकी अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत, त्यात के. के. वाघ अभियांत्रिकीचादेखील समावेश होतो. नॅशनल बोर्ड ऑफ एक्रेडीटेशनच्या १३ तज्ज्ञ सदस्यांनी दि. ४ ते ६ एप्रिल रोजीदरम्यान संस्थेला भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व सहाही विभागांचे विभागप्रमुख यांनी समितीसमोर सादरीकरण केले. विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा व महाविद्यालय राबवत असलेले विविध उपक्रम, अध्ययन, अध्यापन शिक्षणपद्धती, प्रयोगशाळा, मानवी संसाधन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट, क्रीडा, वसतिगृह व इतर सुविधा, अनुभवी प्राध्यापक या बाबींचे काटेकोरपणे निरीक्षण करून मानांकन देण्यात आले.

यापूर्वी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ पर्यंत व एमसीए विभागाला शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२७-२५ पर्यंत मानांकन मिळालेले आहे. अशाप्रकारे एकूण ०७ पदवी व ०१ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना मानांकन मिळवणारे नाशिक विभागातील हे एकमेव महाविद्यालय आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, मा. चांगदेवराव होळकर, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

> **महाविद्यालयाला नॅक या राष्ट्रीय संस्थेतर्फे 'ए' श्रेणी आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्याकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेला आहे. महाविद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. तसेच एन.बी.ए. मानांकनाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थी यांना होईल.**